रक्त शुद्धिचा राजा म्हणजे?
डॉ. वामन गोपाळ
यांचा
आयोडाईज्ड
सार्सापरील्ला!

सावध रहा!
आजच वापरा.
सर्वत्र मिळेल!

REGISTERED No. B. 3434

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख २५ सप्टेंबर १९४६ अंक ३९

तोच सुदिन
कीं
ज्या दिवशीं भारतावर
स्वातंत्र्यसूर्य चमकेल
पण हा सुदिन आपण स्वयंसिद्ध झाल्याविना कसा दिसेल!
याकरतां देशांतील सर्व उद्योगधंदे पूर्ण राष्ट्रीय करून परदेशांत जाणारा द्रव्यौघ थांबविणें, हें आपलें आद्यकर्तव्य ठरतें.
तरी आयुष्याच्या विम्याचा धंदा करणारी
येथील सुप्रसिद्ध
कॉमनवेल्थ
विमा कंपनी लि.,
येथें आपला स्वतःचा विमा उतरून आपल्या कर्तव्यांतून मुक्त व्हा.
एजन्सीसाठीं आजच लिहा अगर भेटा
ल. ब. उर्फ अण्णासाहेब भोपटकर—अध्यक्ष
व एस. एम. जोशी—मॅनेजिंग डायरेक्टर


अधिक धान्य पिकविण्याची योजना
—यशस्वी होण्यास—
किर्लोस्कर पंपिंग सेटस
हें अमोघ साधन आहे.
त्याचें सहाय घ्या!
किर्लोस्कर बंधु, लिमिटेड .... किर्लोस्करवाडी

साठे बिस्किटें
युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती, पण प्रचलित अन्नपरिस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा या बाबतींची नियंत्रणें, तसेंच यंत्रसामुग्रीची ठराविक उत्पादन शक्ति, या कारणामुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.
ग्राहकांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी.

पॉटरी कारखान्याच्या उभारणीसाठी
ठेवी घेणें आहेत
त्रिप्ला कमर्शिअल कं. लि.
सरस्वती-विलास, लक्ष्मी रोड, पुणें २.
ठेवींचे दर
एक वर्ष-४½%; तीन वर्षें-५%; पांच वर्षें-६%.
अर्जाचा नमुना व माहितीपत्रक मागवा.
सोमण रानडे अॅण्ड को. मॅनेजिंग एजण्टस.

## विविध माहिती

**नॅशनल इन्फर्मेशन अँड पब्लिकेशन्स लि. मुंबई**—पुस्तकें प्रसिद्ध करणें, अद्यावत छापखाना चालविणें, वगैरे उद्देशानें वरील कंपनीची स्थापना झाली आहे. २५ लाखांचें भांडवल विक्रीस काढलें आहे. नायर प्रेस सिंडिकेट लि. कडे कंपनीची मॅनेजिंग एजन्सी आहे. ह्या सिंडिकेटच्या मिसेस कुसुम नायर ह्या एकमेव डायरेक्टर आहेत. कंपनीला श्री. धरमसी खटाव हे कोट्याधीश चेअरमनचे जागीं लाभले आहेत. ३७ मोठ्या कंपन्यांचे ते डायरेक्टर असल्याचें प्रॉस्पेक्टसवरून दिसतें. श्री. सरोजिनी नायडू, श्री. कमलादेवी चट्टोपाध्याय, श्री. गगनविहारी मेहता, श्री. युसुफ मेहेरअली वगैरे मंडळी डायरेक्टर बोर्डावर आहेत.

**सबंद वर्षांत एकहि बँक बुडाली नाहीं**—अमेरिकेंत १९४५ सालीं एकहि बँक बुडाली नाहीं. सबंद वर्षांत एकहि बँक न बुडण्याचें अनेक पिढ्यांचे कालांतील हें पहिलेंच उदाहरण आहे. उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्या उत्कृष्ट चलतीचा हा परिणाम आहे.

**हिंदुस्थान मोटर्स लि.**—बिर्ला ब्रदर्स लि. ह्या मॅनेजिंग एजन्सीखालील वरील कंपनीनें ३१ मार्च अखेर संपलेल्या वर्षी ३२,४४३ रु. नफा दाखविला. कंपनीचें वसूल भांडवल ४ कोटि, ७७ लक्ष रुपये आहे. कंपनीच्या कारखान्याची पूर्व तयारी चालू आहे. तूर्त कंपनीनें ४ कोटि, ४२ लक्ष रुपये व्याजीं लावून गुंतवले आहेत. सध्या बाजारांत विकली जात असलेली "हिंदुस्थान १०" ही मोटारगाडी आयात करण्यांत येत आहे.

**"चालू आर्थिक घडामोडी"**—वरील विषयावर "अर्था" चे संपादक श्री. श्री. वा. काळे, ह्यांचें मुंबई नभोवाणीवर शनिवार ता. २८ रोजीं रात्रीं ८–३० वाजतां भाषण होणार आहे.

**दि बँक ऑफ कराड, लि.**—श्री. ल. म. देशपांडे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं स्थापन झालेल्या वरील बँकेची स्टॅच्यूटरी सभा ता. २९ रोजीं भरणार आहे. १$\frac{1}{4}$ लक्ष रुपयांचें वसूल भांडवल, ६ लक्ष रुपयांच्या ठेवी, २$\frac{1}{2}$ लक्ष रुपयांचीं कर्जे, असा बँकेच्या प्रगतीचा अहवाल आहे. १,७८२ रुपयांत प्राथमिक खर्च आतांपर्यंत भागविलेला आहे. श्री. विष्णुपंत शिराळकर हे बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर असून श्री. म. वि. खंडकर हे मॅनेजर आहेत. डायरेक्टर बोर्डांत श्री. काकुभाई वखारिया, श्री. एस. पी. ओगले, श्री. विष्णुपंत वेलणकर, श्री. आर. जी. कुलकर्णी, श्री. पांडुअण्णा शिराळकर वगैरे वजनदार मंडळी आहेत.

**दि आयुर्वेद रसशाळा पुणें लि.**—३१ मे, १९४६ अखेर संपणाऱ्या वर्षी रसशाळेची एकुण विक्री ३७४,५९४ रुपयांची होऊन निव्वळ नफा २१,५४३ रु. उरला. कंपनीचे मॅ. एजंटस मे. पुरुषोत्तम आणि कं. ह्यांनीं आपल्या मुशाहिऱ्यापैकी २,७७१ रु. कमी घेतले आहेत. साधारण भागीदारांना ४% दर रुपयास ५ आणेप्रमाणें इनकमटॅक्स वजा करून डिव्हिडंड मिळणार आहे. शिल्लक माल ४ लक्ष, ३५ हजारांचा आहे. १९४४–४५ मध्यें ३५,३५७ रु. नफा झाला होता.

**लोकरीचा माल येणार**—लढाई सुरू झाल्यापासून लोकरीच्या मालाची येथें कमतरता भासत होती. परंतु २३ जुलै, १९४६ पासून स्टर्लिंग चलनाच्या देशांकडून लोकरीचा माल आयात करण्याची परवानगी हिंदुस्थान सरकारनें दिल्यामुळें येत्या हिवाळ्यांत अधिक लोकरीचा माल येईल असा अंदाज आहे. ऑस्ट्रेलियाकडून पुरवठा होऊं लागला आहे व इटालींतील लोकरीचा माल आयात करण्याकरतांहि परवाने दिले जातील असें वाटतें. हिंदुस्थानांत दरवर्षी ३६ लक्ष पौंड लोकरीचा माल खपतो व यापैकीं १६ लक्ष पौंड माल हिंदुस्थानांत तयार होतो.

**अमेरिकन शेतकी-तज्ञ इंग्लंडला जाणार**—कॉलेजें व सरकारी खात्यांतील आठ अमेरिकन तज्ञ सरकारी निमंत्रणावरून इंग्लंडला जाणार आहेत. शेतीविषयक संशोधन कार्यालयें व शैक्षणिक संस्था यांची पाहणी करण्याकरतां ते एक महिना हिंडतील.




सारस्वत

को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[स्थापना १९१८]सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई

टे. नं. ३१६७५ ३१–८–१९४६

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ४,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ३,९६,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स् ... | रु. १,८५,००० |
| ठेवी ... | रु. ६५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ७१,००,००० |

स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट स्कीम

व्याज : २ टक्के

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

—विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन | एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

सब–ऑफिस : दादर, ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )



दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड.

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | ,, १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | ,, ६,७७,३७० |
| एकूण खेळतें भांडवल | ,, ५८,००,००० |

मद्रास, सोलापूर, नगर व मुंबईवर ड्राफ्टस् दिले जातात.

शेअर सर्टिफिकेटस् तयार आहेत. तरी शेअरबाबतच्या पावत्या पाठवून दिल्याबरोबर सर्टिफिकेटस् पाठविण्याची व्यवस्था होईल.

गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एल्एल्. बी., मॅनेजर

चिं. त्रिंबक चितळे मॅ. डायरेक्टर

# शेतांच्या तुकड्यांस प्रतिबंध व त्यांचें एकत्रीकरण

## मुंबई सरकारच्या बिलांतील एकत्रीकरणाची पद्धत

एकाद्या खेड्यांतील, महालांतील अगर तालुक्यांतील शेतजमिनीची अधिक चांगली मशागत व्हावी या हेतूनें शेत-जमिनीचें एकत्रीकरण करण्याचा आपला इरादा सरकारला जाहीर करतां येईल. अशी माहिती त्या त्या खेड्यांना अगर तालुक्यांना सरकारी गॅझेटमध्यें देण्यांत आल्यावर एक कन्सॉलिडेशन ऑफिसर नेमण्यांत येईल आणि तो नियमाप्रमाणें योजनेच्या कामाला प्रारंभ करील.

एकत्रीकरणाच्या योजनेप्रमाणें एकाद्या शेत-मालकाला अगर जमीन धारण करणाऱ्याला पूर्वीपेक्षा कमी किमतीची जमीन देण्यांत आली तर ज्याला पूर्वीपेक्षा अधिक किमतीची जमीन् देण्यांत आली असेल त्याच्याकडून नुकसान-भरपाई देवविण्याची सोय कन्सॉलिडेशन अधिकाऱ्यानें केली पाहिजे.

एकादी योजना अंमलांत आणतांना एकादा रस्ता, वाट, गल्ली अगर दुसरा मार्ग शेत-जमिनींत समाविष्ट करणें जरूर वाटलें तर अशा रस्त्यावरील सार्वजनिक अगर व्यक्तिविषयक हक्क रद्द झाले आहेत किंवा जरूर पडल्यास हे हक्क अमुक एका तुकड्यांत समाविष्ट केले आहेत असें कन्सॉलिडेशन ऑफिसर जाहीर करील; अशा योजनेमुळें कोणाच्या हक्काला बाध आला असल्यास त्यानें अधिकाऱ्याच्या पत्रकानंतर ३० दिवसांच्या आंत आपली हरकत त्याला तपशीलवार लेखी कळविली पाहिजे.

कन्सॉलिडेशन ऑफिसर अशा हरकतींचा विचार करून त्यासंबंधीं आपल्या शिफारशीसह, प्रकरण सेटलमेंट ऑफिसरपुढें ठेवील. सेटलमेंट ऑफिसरचा निर्णय, प्रांतिक सरकारचा फेरबदल करण्याचा अधिकार कायम ठेवून, अखेरचा समजला जाईल.

एकाद्या सार्वजनिक कामासाठी वापरण्यांत येणारी जमीन काढून घेण्याचा व त्याऐवजी दुसरी जमीन देण्याचा अधिकार कन्सॉलिडेशन ऑफिसरला राहील.

### कच्ची व अखेरची योजना

एकत्रीकरणाची कच्ची योजना तयार झाल्यावर ती संबंधित खेड्यांतून प्रसिद्ध करण्यांत येईल. योजनेला कांहीं हरकत असल्यास ती त्यानंतर ३० दिवसांच्या आंत कॅन्सॉलिडेशन ऑफिसरला कळविली पाहिजे.

दिलेल्या मुदतींत मूळ योजनेस अगर दुरुस्त योजनेला कांहीं हरकत घेण्यांत आली नसल्यास सेटलमेंट कमिशनर योजनेला आपली मंजुरी देईल. हरकती आल्या असल्यास त्यांचा विचार करून आपल्या सूचनांसह कॅन्सॉलिडेशन ऑफिसर ती योजना प्रांतिक सरकाराकडे पाठवील.

एकत्रीकरणाची अखेरची योजना संबंधित भागांत गॅझेटमध्यें प्रसिद्ध केल्यावर, जमिनींचे मालक अगर धारण करणारे त्यांना देण्यांत आलेल्या जमिनी ताब्यांत घेण्यास तयार असतील तर कन्सॉलिडेशन ऑफिसर त्यांना तसें करूं देईल. संबंधित लोकांपैकी सर्व योजनेला तयार नसतील तर त्यांना देण्यांत आलेल्या जमिनी पुढील शेतीच्या वर्षापासून ताब्यांत घेण्याचा हक्क राहील.

योजनेंत समाविष्ट केलेल्या जमिनी योग्य त्या इसमांनीं ताब्यांत घेतल्यावर योजना अंमलांत आली असें समजण्यांत येईल.

शेतमालकांचे अगर जमीन धारण करणारांचे हक्कसंबंध दुसऱ्यांना विकत अगर इतर मार्गांनीं घेतां देतां येतील.

योजनेप्रमाणें ज्याला जमीन देण्यांत आली असेल त्याला कॅन्सॉलिडेशन ऑफिसर तसा दाखला देईल.

योजनेचा खर्च संबंधित जमीनमालकाकडून अगर धारण करणाराकडून घेतां येईल.

(१) ज्या जमिनी योजनेंत समाविष्ट केलेल्या असतील त्यांवरील शेतसाऱ्याच्या रकमेच्या निम्मी इतकी सूट योजना अमलांत आणल्यापासून ३ वर्षेपर्यंत देण्यांत येईल.

(२) योजना अंमलांत आणण्यासाठी जमिनीच्या मालकाला कर्ज देण्यांत येईल व तें १८८३ च्या जमीन सुधारणा–कर्ज–कायद्याप्रमाणें फेडून घेण्यांत येईल.

### देणेकऱ्याचा बोजा

योजनेंत समावेश केलेल्या शेतजमिनीवर जर कोणा देणेकराचा बोजा असेल तर, त्या शेत–जमिनीच्या मालकाला योजनेंत जी जमिन देण्यांत आली असेल तीवर तो बोजा बदली केला जाईल. ज्याचा बोजा असेल त्याला आपले हक्क या झालेल्या बदलाप्रमाणें वापरतां येतील. या व्यवहारांत पहिल्या जमिनीपेक्षा नवीन जमीन कमी किमतीची असेल तर, देणेकऱ्याला नुकसानभरपाईचा हक्क राहील.

या कायद्याप्रमाणें योजनेंत ज्याला जमीन देण्यांत आली असेल, त्याला आपल्या जमिनीपैकीं कोणताही भाग ठरवून दिलेल्या क्षेत्रफळापेक्षां कमी आहे अगर जो विकत दिल्यानें उरलेला भाग, ठरवून दिलेल्या क्षेत्रफळापेक्षां कमी भरेल, तर दुसऱ्याला देतां येणार नाहीं. तसा भाग कांहीं अटींवरच देतां येईल व त्यासाठी सरकारची लेखी परवानगी घ्यावी लागेल.

अंमलांत आलेली एकादी योजना सदोष असल्याचें आढळून आल्यास तींत बदल करण्याचा अधिकार प्रांतिक सरकारला आहे. अशावेळीं मूळ योजनेंत करण्यांत आलेले फरक प्रसिद्ध करण्यांत येतील. या नवीन फरक केलेल्या मसुद्यासंबंधींच्या हरकती एक महिन्याच्या आंत प्रांतिक सरकारकडे कळवावयाच्या आहेत.

या कायद्यान्वयें अंमलांत आलेल्या योजनेंत बदल करण्याचा अगर ती रद्द करण्याचा अधिकार प्रांतिक सरकारनें राखून ठेवलेला आहे.

या कायद्याची अंमलबजावणी योग्य रीतीनें होत आहे अशी खात्री करून घेण्यासाठी कोणत्याही अधिकाऱ्यानें या कायद्यान्वयें दिलेल्या हुकमाचे कागदपत्र वगैरे मागविण्याचा व नंतर वाटेल तो हुकूम देण्याचा अधिकार प्रांतिक सरकारला आहे.

भाग दोन, तीन अगर चार यांबरहुकूम झालेल्या हुकुमावर फक्त या कायद्यांत नमूद केल्याप्रमाणेंच अपील अगर फेरविचार करण्यांत येईल.

कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी जरूर ते नियम करण्याचा अधिकार प्रांतिक सरकारला आहे. असे नियम सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध करण्यांत येतील.


# दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

हेड ऑफिस : १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई

एकूण खेळतें भांडवल : २,९०,००,००० रु.

वसूल भांडवल, रिझर्व्ह व इतर फंड : ११,६१,९४६ रु.

स्थानिक शाखा : १ दादर, २ गिरगांव, ३ ग्रँटरोड, ४ जव्हेरी बाजार, ५ माटुंगा, ६ शीव, ७ विलेपार्ले.

इतर शाखा : ८ अहमदाबाद, ९ अहमदनगर, १० अकोला, ११ अमरावती, १२ बडनेरा, १३ बेळगांव, १४ चांदा, १५ क्रॅडॉक टाऊन (सी. पी.), १६ दिल्ली, १७ देवळाली, १८ धुळें, १९ गुरगांव (पंजाब), २० इचलकरंजी, २१ जळगांव, २२ कारंजा, २३ कोल्हापूर, २४ कोपरगांव, २५ लोणंद, २६ महाड, २७ मालेगांव, २८ मिरज, २९ मूर्तिजापूर, ३० नागपूर शहर, ३१ नंदुरबार, ३२ नाशिक शहर, ३३ नाशिक रोड, ३४ पंढरपूर, ३५ पहाडगंज, ३६ पेण, ३७ पुणें शहर, ३८ पिंपळगांव ३९ संगमनेर, ४० सांगली, ४१ शाहूपुरी, ४२ सिन्नर, ४३ सिनावर्डी, ४४ यवतमाळ.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

डी. एन. गांडेकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजर, पुणें शाखा (बुधवार चौक)

डी. डी. देशपांडे, बी. ए.
मॅनेजिंग डायरेक्टर.

## बँकांचे वार्षिक अहवाल

**दि बँक ऑफ सिटिझन्स लि., बेळगांव** चें सेळतें भांडवल एका वर्षांत ३७ लाखांचें ५१ लाखांवर गेलें आहे. ३०।६।४६ अखेरच्या वर्षी बँकेस ५८,४७७ रु. निवळ नफा झाला. भागीदारांस ६% करमाफ डिव्हिडंडला १९,९५६ रु. लागतील. १५ हजारांची कराची तरतूद करून बाकी वेगवेगळ्या रिझर्व्ह फंडांत जाईल. बँकेचें वसूल भांडवल ३,३९,३५० रु. असून इतर फंड ६७,७९० रुपयांचे आहेत. बँकेच्या एकुण भांडवला-पैकी सुमारें २७ लक्ष रुपयांचीं कर्जें दिलेलीं आहेत त्यापैकीं २५ लक्षांची कर्जें सोनें, कोठार व स्थावर मिळकत ह्यांचें तारणावरील आहेत आणि बँकेनें २१ लक्ष रुपये रोख व रोख्यांत म्हणजे तरते ठेवले आहेत.

**मुंबई प्रांतिक सहकारी बँक लि., मुंबई** कडील ठेवींत गेल्या वर्षी १½ कोटींची भर पडली आणि बँकेची सरकारी व ट्रस्टी रोखे ह्यांतील गुंतवणूक, १½ कोटींनीं वाढली. बँकेजवळील उपलब्ध पैसा वाढला तरी सहकारी सोसायट्यांकडील कर्जें ५१ हजारांनीं कमी झालीं मार्केटिंग कर्जांतहि १७ लाखांची घट झाली. बँकेनें नातेपुतें, कळवण, धंडुका व संगमनेर येथें उपशाखा उघडल्या. बँकेचे गेल्या २६ वर्षांचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वैकुंठराय मेहता हे अर्थमंत्री झाल्यावर त्यांचे जागीं डायरेक्टर श्री. व्ही. पी. वर्दे ह्यांची निवडणूक झाली व त्यांनी हें काम विनावेतन केलें. अहवालाचे वर्षी बँकेस ३,२४,२२८ रु. नफा झाला. भागीदारांस ४% डिव्हिडंड + १% बोनस देण्यांत याव-याचें आहे.

**पुणें जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.** च्या नोकर वर्गांत बरेच बदल झाले व त्यामुळें सुसूत्र धोरण सांभाळणें कठीण झालें. ह्या वर्षी फक्त ७,७०० रुपयांचीं ५ नवीं कर्जें देण्यांत आलीं. "ह्यापुढें प्रांतिक लँड मॉर्गेज बँकेचा हप्ता व्याज मुद्दलासह संपूर्ण फेडला जाईल किंवा कसें ह्याची चिंता वाटते." वर्षभर कायम पगारदार नोकर नस-ल्यानें बचत झाली त्यामुळें ६३९ रु. नफा झाला.

**सोलापूर डि. सें. को. बँक लि.** कडे ३२½ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत, त्या सरकारी मर्यादेबाहेर आहेत. सरकारनें अधिकृत भांडवल दीड लाखांवरून तीन लाखांवर नेण्यास मंजुरी दिली आहे. तिचा सहकारी संस्थांकडील कर्जांचा आकडा वाढून ३½ लाखांवर गेला आहे. बँकेला तिच्या बँकिंगच्या व्यवहारांत १२,३३५ रु. व वाटप दुकानांत २१,१२२ रु. नफा झाला. एकूण नफ्यापैकीं फक्त ८,३०० रुपये भागीदारांत ६% दरानें वाटले जातील.

**भुसावळ पीपल्स को. बँक लि.** ८७½ हजार रु. वसूल भांडवल, १ लक्ष २० हजार रु. रिझर्व्ह व इतर फंड आणि १३¾ लाखांच्या ठेवी असें वरील बँकेचें 'देणें' आहे व त्यावरून तिचा भक्कमपणा दिसून येतो. एकूण सेळत्या भांडवलापैकी फक्त १८% रक्कम कर्जांत गुंतलेली असून बाकीची तरती आहे. गेल्या वर्षी वसुली चांगली झाली. रोखे सरेदींत नफा झाल्यामुळें निवळ नफ्याची रक्कम मोठी झाली. भागीदारांना ७½% डिव्हिडंड मिळणार आहे.

**दि लक्ष्मी को. बँक लि., सोलापूर.** ठेवींत ५० हजारांची वाढ झाली. रकमा शिल्लक राहूं लागल्यामुळें सरकारी रोख्यांत गुंतवाव्या लागल्या. एकूण नफा २,९६१ रु. झाला. ५% डिव्हिडंड देण्यांत येईल.

**बेळगांव डि. सें. को. बँक लि.** चें सेळतें भांडवल १३ लाखांनीं वाढून तें ५५ लक्ष, ३४ हजार झालें आहे. बँकेचें स्वतःचे फंड ८ लक्ष, ४० हजारांवर गेले आहेत. गेले सालीं बँकेस ५०,७३३ रु. नफा झाला. बँकेच्या सर्वच शाखा नफ्यांत आहेत. निपाणी, बैलहोंगल व अथणी ह्या शाखांचा नफा तर उत्कृष्ट आहे. भागीदारांस ५% + ½% डिव्हिडंड मिळेल.

**दि पूना अर्बन को. बँक लि.** गेलीं २१ वर्षे सोसायटी होती; अहवालाचे वर्षी तिचें बँकेंत रूपांतर झालें. बँकेस १,०९,९०९ रु. सेळत्या भांडवलावर ९६५ रु. नफा झाला. भागीदारांना १७/८% दरानें ४७३ रु. डिव्हिडंड मिळेल.

**विटा मर्चंट्स को. बँक लि.** कडे अहवालाचे साल अखेरीस थक बाकी कांहींही नाहीं. ठेवींचा आकडा २ लक्ष, ४५ हजारांवर गेला आहे. दिलेल्या कर्जांतहि मोठी वाढ आहे. ४,१०२ रुपये नफ्यांतून ६७/८% डिव्हिडंडला २,४७७ रु. लागतील.













पुणें चीफ एजंटस:-
मेसर्स श्री दत्त एजन्सी,
१००, रविवार पेठ, मोती चौक, पु






व्याजवजा

# मुंबई शेअर बाजार

(वि. म. लिमये आणि मं. यांजकडून)

+कोहिनूर रु. १२ दि. १७-९-४६
डाइंग रु. २५ दि. २६-९-४६

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार १७।९।४६ | बुधवार १८।९।४६ | गुरुवार १९।९।४६ | शुक्रवार २०।९।४६ | सोमवार २३।९।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स | ३० | बाजार बंद | २९५५ | २८३० | २९३२-८ | ३०४० |
| ४८०; ३७२ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | | ५३७ | ५१५ | ५३० | ५४३ |
| २२२२-८; १७६३-१२ | २५-०-०† | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाइंग | २५० | | २८६५ | २८३० | ३१८० | ३१६०-० |
| ७०२; ५६६ | १२-०-०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | | ९४८+ | ८७४-० | ९१०-० | ९५२-० |
| ६६८; ५०७ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | | ७५८ | ६९८-० | ७३३-० | ७५८-० |
| ४४३-८; ३६० | ५-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | | ४३९ | ४०२-० | ४०५-० | ४२४-० |
| ३४२-०; २७५ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | | ४२४ | ३९८-० | ४१७-० | ४३३-० |
| ३३५; २८३-८ | ८-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | | ४०८ | ३७०-० | ४००-० | ४२६-० |
| ३३७; २४३ | ९-०-०S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | | ४३५ | ४०-०-० | ४१८-० | ४३८-० |
| ५; ३-११-० | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | | ५-३-० | ५-०-६ | ५—२ | ५—५ |
| १७-१०; १३-७-० | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | | २३ ६-० | २१—११ | २३—० | २३-१४ |
| ३-१०; २-९ | ०-३-० | मे | ,, डिफर्ड्स | १ | | ४-१५-० | ४-११ | ४-१५ | ५—२ |
| ७९०; ६४५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | | ८४७-८ | ८०५-० | ८३७-८ | ८६६-४ |
| २४३-८; २०६-८ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | | २४३-८ | २४०-० | २४३-० | २४७-८ |
| २५६; २१३-८ | ८-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | | ३०९-० | ३०२-० | ३१०-० | ३२६-० |
| ५९२-८; ५१०-० | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | | ६७७-८ | ६३५-० | ६४६-४ | ६९२-८ |
| ४३-७; ३०-१२ | ०-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | | ४७-१२ | ४४—२ | ४७—० | ४७-१२ |

सोमवार दि. २३-९-४६ चे भाव

**बँका**

| | |
|---|---|
| बरोडा | १९१—० |
| सेंट्रल | १३०—० |
| इंडिया | २४२—० |
| इंपी० | २८७५—० |
| | ७०५—० |
| रिझर्व्ह | १५१—० |

**वीज कंपन्या**

| | |
|---|---|
| आंध्र व्हॅली | १९६० |
| बॉम्बे ट्रॅम | १३६ |
| टाटा हायड्रो | २१० |
| टाटा पॉवर | १९७५ |

**संकीर्ण**

| | |
|---|---|
| अलकॉक | ५६२—८ |
| चौंचे स्टीम | ७१५—० |
| न्यू इंडिया | ११३—० |
| शिवराजपुर | ५—० |
| टाटा केमिकल | २४—० |
| टाटा ऑईल | ११३—० |


छत्रे यांचा कोल्हापुरी- संगीत चिवडा
वापरून पाहुण्यांस खूष ठेवा.
किंमत १ रत्तलाला २ रुपये.
मालकः—एन. व्ही. वेलणकर, गिरगांव रोड
फो. नं. २२८४९ ] मुंबई ४.







महाराष्ट्र एजंट:—मे. जयप्रकाश आणि कं., २५५।४ सदाशिव पेठ, पुणें २
( गांवोगांवीं स्टॉकिस्ट नेमणें आहेत. )

आंध्र खादीचे ( म्हणजेच ४० नंबराच्या वरच्या नंबराच्या सुताच्या खादीचे )
—एकमेव विक्रेते—

खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
दमेढेरे बोळाजवळ,
पुणें २

## सहकारी संस्थांचा नोकरवर्ग

युद्धोत्तर पुनर्रचनेंत सहकारी चळवळीचा जितका उपयोग करून घेतां येईल तितका उपयोग करून घेण्याचे दृष्टीनें सांप्रत निरनिराळ्या योजना पुढें येत आहेत व त्यावर विचारविनिमय करून त्या योजनांची अंमलबजावणी पण करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. सहकारी चळवळीची सर्वांगीण वाढ होण्याचे दृष्टीनें ही गोष्ट कोठांहि समाधानकारकच आहे. परंतु प्रत्येक योजनेविषयीं विचार करतांना ती योजना राबवणाऱ्या योग्य नोकरवर्गाची उणीव फारच तीव्रतेनें भासत आहे, हें खरोखरीच दुर्दैव होय. आणि निव्वळ याच कारणासाठीं कित्येक योजनांचा विचार करणेंसुद्धां लांबणीवर टाकावें लागत आहे.

तात्त्विक दृष्ट्या सहकारी चळवळीमध्यें नोकरवर्गावर इतकें विसंबून राहण्याचीही जरूरी नाहीं; परंतु आपणाकडील आजपर्यंतच्या सहकारी चळवळीच्या यशाची मदार सर्वस्वीं जरी नसली तरी बहुंशीं सहकारी क्षेत्रांत कार्य करीत असलेल्या नोकरवर्गाच्या परिश्रमावर व स्वार्थत्यागावरच असलेली या क्षेत्रांतील तज्ज्ञांना बारकाईनें पाहिल्यास आढळून येईल. ही गोष्ट चांगली कीं वाईट हा प्रश्न सध्यां बाजूला ठेवला तरी आपणाकडील सहकारी चळवळीची आजतागायत झालेली प्रगति लक्षांत घेतां, सहकारी चळवळीच्या कार्यक्षेत्राचा फारच थोडा भाग आपण व्यापला असून आपणास सहकारी तत्त्वावर अद्याप कितीतरी गोष्टी करावयाच्या आहेत असें दिसून येईल व या गोष्टी करतांना सहकारी कार्यक्षेत्रांतील नोकरवर्गाची मदत हरएक बाबतींत आपणास घ्यावी लागेल असें आजपर्यंतच्या अनुभवावरून म्हणावें लागतें. तसें पाहिलें तर इतर कार्यक्षेत्रांतील नोकरवर्गापेक्षां हा नोकरवर्ग योग्य संधि मिळाल्यास सहकारी चळवळींत अधिक मानाचें व महत्त्वाचें स्थान पटकावील यांत शंकाच वाटत नाहीं. या नोकरवर्गाला आपलें नेहमीचें काम इतरांप्रमाणें संभाळावें तर लागतेंच परंतु त्याबरोबरच एखाद्या धर्मप्रचारकाप्रमाणें सहकारी चळवळीची बीजें तो करीत असलेल्या कार्यक्षेत्रांतील लोकांच्या मनांत खोलवर रुजतील अशा बेतानें त्यांची मनोभूमिका त्यास तयार करावयाची असते. कायदा व व्यवहार यांची सांगड घालण्याचें नाजूक काम त्यासच कौशल्यानें करावयाचें असतें. येणाऱ्या अनेक अडीअडचणींना तोंड देऊन कित्येक गुंतागुंतीचे प्रश्न त्यास स्वतःचे जबाबदारीवर सोडवावयाचे असतात. सरकारी बंधनें पाळून जनतेच्या अडचणी सोडवणाऱ्या या नोकरवर्गाला मात्र धड कोणाचाच आधार नाहीं. सरकारला जरूरी नाहीं म्हणून व जनतेला या नोकरवर्गाच्या कार्याची कल्पना नाहीं म्हणून मधल्यामध्यें हा नोकरवर्ग तसाच लोंबकळत पडला आहे. जीवनास आवश्यक गरजा भागवण्यापुरेसा सुद्धां पैसा येथें मिळणें मुष्कील झालें आहे. नोकरीच्या शाश्वतीची पण तीच परिस्थिति. अशा स्थितींत चांगला नोकरवर्ग टिकवून धरण्याचे दृष्टीनें कितीतरी गोष्टी वेळींच करणें सहकारी कार्यकर्त्यांचे दृष्टीनें आज जरूर आहे. अशा कांहीं उपाययोजना तावडतोबीनें झाल्या तरच सहकारी चळवळीची सर्वांगीण वाढ लवकर होणें अधिक शक्य आहे.

ह. वि. सहस्रबुद्धे

## व्यापारी अब्रूची नुकसानभरपाई

मुंबईच्या क्रॉफर्ड मार्केट शेजारी मोहनलाल गोकुळदास नांवाच्या एका व्यापाऱ्यानें आपल्या जवळचा कानपूर टेक्स्टिल्सचा माल लेबलावरील किंमतीपेक्षां शेंकडा १२॥ टक्के कमी भावानें विकावयास काढून तशी जाहिरात जून १९४३ मध्यें दिली. कानपूर मिल्स डेपो नांवाचें दुसरें एक दुकान चर्चगेट स्ट्रीटवर एल्जिन मिलचा माल विकत असे. त्या दुकानातर्फे कांहीं वर्तमानपत्रांत जाहीर करण्यांत आलें कीं कांहीं व्यापारी कानपूरचा एल्जिनचा माल स्वस्त भावानें देण्याचें जाहीर करून बनावट माल विकीत आहेत. अर्थातच या आरोपाचा रोख मोहनलाल गोकुळदास यांजवर होता. तेव्हां त्यांनीं कानपूर मिल्स डेपोविरुद्ध पंचवीस हजारांचा अब्रुनुकसानीचा दावा लावला. प्रतिवादींनीं प्रथम आपली विधानें खरीं असल्याची कैफियत मांडली. परंतु पुढें पुरावा देण्याचे वेळीं दावा पुढें चालविणें श्रेयस्कर न वाटून त्यांनीं अब्रु-नुकसानीबद्दल रु. २५० व दाव्याच्या खर्चाबद्दल रु. ४,००० देऊं केले. ते स्वीकारून वादींनीं प्रतिवादींशीं तडजोड केली.

पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८

महाराष्ट्र शारदेचीं तेजस्वी ग्रंथरत्नें वाचून
**पैसा व ज्ञान मिळवा !**
**श्रीमंत कसें व्हावें**—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक ! हजारों रुपये मिळवून देतो. वाचून लक्षावधी व्हा ! किं. १॥ रु.
**१०० टक्के यश**—हें भाग्यवर्धक पुस्तक तुम्हांला व्यवहार, व्यापार व उद्योगधंदे यांत बिनचूक यश कसें मिळवावें तें शिकवील आणि कर्तबगार बनवील ! किं. १॥ रु.
**काम आणि कामिनी**—तरुण स्त्रीपुरुषांच्या नैसर्गिक कामसौख्याचें सुंदर मार्गदर्शन करतें व स्त्रीस्वभावाची खरी कल्पना देतें ! अत्यंत लोकप्रिय. किं. १॥ रु.
**मृत्युलोकचा प्रवास**—मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालींच्या सुरम्य कथा. वाचून थक्क व्हाल ! किं. १ रु.—चारी पुस्तकें एकत्र घेतल्यास पोस्टेज माफ !
मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

**बिनचूकच्या माहितीनें**
**स्त्रियांचें तारुण्य आणि लावण्य कायम टिकतें**
किं. रु. ३-९ व रु. ५-९. मा. पुस्तक आणे ४.
१२ आणे अगाऊ आल्यास औषध व्ही. पी. नें पाठवूं.
—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
भायखळा पूल, मुंबई नं. २७.
पुना स्टॉकिस्ट : सिताराम एजन्सी, ६९३ बुधवार पेठ, पुणें.
—— :इतर सर्वत्र स्टॉकिस्ट पाहिजेत : ——



मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।८ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद गोविंद काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३, शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.